**<u>प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे सा. क्र. ३ चा अतिरिक्त सरतपास – श्री. एस.आर.पोवार.</u>**

**५.** आता मला नि.क्र.२५५ चा दस्त दाखवला, तो माझ्या हस्ताक्षरात लिहिण्यात आलेला आहे. त्यावर वादी, प्रतिवादी क्र. १ व २ आणि साक्षीदारांच्या स्वाक्ष–या असून त्या मी ओळखतो. मी त्यातील मजकूर वादी व प्रतिवादी क्र.१ आणि २ च्या सांगण्या प्रमाणे लिहिलेला असून तो बरोबर आहे. त्याला **नि. क्र.२५५** कायम करण्यात येतो. (सदर दस्ताला निशाणी क्रमांक कायम करण्यास वादीतर्फे तो मुंबई मुद्रांक अधिनियमांच्या तरतूदी प्रमाणे योग्य मुद्रांकशुल्कावर तयार करण्यात आलेला नसल्यामुळे पुराव्यासाठी ग्राहय धरता येऊ शकत नसल्याचा आक्षेप घेण्यात आलेला आहे. सदरचा दस्त साक्षीदाराने लिहिलेला असून त्याबाबत पुरावा देत असल्यामुळे आक्षेप नाकारुन निशाणी क्रमांक कायम करण्यात आला.)

**सरतपास पुर्ण.**

**<u>वादी तर्फे उलट तपास – श्री. एस. एम. देशपांडे वकील.</u>**

६. माझी जन्मतारीख दिनांक ०१.०६.१९७३ आहे. माझे आज रोजी वय ५१ वर्षे आहे. माझे पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण हालेवाडी येथील प्राथमिक शाळेत झालेले आहे. मी १९८९–१९९० साली शाळेतून सातवीचे शिक्षण पुर्ण केले आहे.

७. माझे बारावी पर्यंतचे शिक्षण झालेले आहे. मी १९९४ साली बारावी उत्तीर्ण झालो आहे. मी सध्या मुंबई येथे हॉटेल व्यवसाय करत असून पतसंस्थेसाठी नित्यनिधी गोळा करण्याचे काम करतो. मी १९९४–१९९५ पासून मुंबईला राहत आहे. मी मुंबई येथील दिवाकर को–ऑप क्रेडिट सोसायटीचा अध्यक्ष म्हणून २०१७ ते २०२२ पर्यंत कामकाज पाहिले आहे. प्रतिवादी क्र.२ हा सदर संस्थेमध्ये तज्ञ संचालक आहे.

८. मी दिवाकर सोसायटीचा नित्यनिधी गोळा करण्याचे काम करत आहे. मला मुंबई येथील दुर्गा क्रेडिट सोसायटी असल्याची माहिती आहे, प्रतिवादी क्र.२ हा तिचा अध्यक्ष आहे. हे म्हणणे खरे नाही की, लहू पन्हाळकर त्या सोसायटीमध्ये नोकरीला होता. विठ्ठल पाटील हा दुर्गा सोसायटीचा कर्मचारी होता.

९. मी आजपर्यंत नि.क्र.२५५ प्रमाणे तीन ते चार कागदपत्रे लिहिली आहेत. मला कोणताही कागद लिहिल्या नंतर तो लिहिल्या बाबत स्वाक्षरी करावी लागत असते याची

माहिती नाही. मला नि. क्र.२५५ चा दस्त लिहिण्यासाठी वादी व प्रतिवादी क्र.१ यांनी निरोप दिला होता, त्यावेळी मी माझ्या घरी होतो. मला तो दस्त कधी लिहिला त्याचा वार आठवत नाही. मला सायंकाळी ०५.०० ते ०६.०० वाजेच्या दरम्यान बोलावण्यात आले होते. मी बोलावल्यानंतर अर्धा तासाने गेलो होतो. मी १९९० पुर्वी कोणतेही दस्त लिहिलेले नव्हते. आमच्या गावात दस्त लिहू शकणारी माझ्यापेक्षा वयाने मोठी माणसे असू शकतील.

**१०**. मला नि. क्र.२५५ मधील जमिनींचे आणि घर मिळकतींचे क्रमांक सांगता येणार नाहीत. मी तो दस्त लिहिण्यापूर्वी त्यातील मिळकतींचे कोणतेही उतारे पाहिले नव्हते. मला कोणत्या व्यक्तीला कोणत्या गट क्रमांकाची जमीन व घर मिळकत दिली होती याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. ३०.०५.१९९० रोजी कथन करत असल्याप्रमाणे वादी व प्रतिवादींमधील कोणताही दस्त लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेल्या दस्तावरती वादी, प्रतिवादी क्र.१ व २ आणि साक्षीदारांनी स्वाक्ष-या केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेल्या व्यक्तीच्या नि. क्र. २५५ वरती स्वाक्ष-या नाहीत.

**११**. माझे व प्रतिवादी क्र.२ चे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याच्या सांगण्यावरुन नि.क्र.२५५ चा दस्त लिहिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दस्तातील हस्ताक्षर माझे नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १९.११.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.